# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १५४/२०११-१२/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मारुती महादेव खर्जे,<br>मु.पो. कोत्येनबोबलाद, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. मारुती महादेव खर्जे, मु.पो. कोत्येनबोबलाद, ता.जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. ८.१२.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अर्जदार यांनी आपली शेत जमीन गट क्र. ३९१ येथे ५ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. १६.६.२०११ रोजी अर्ज केला. या अर्जास वितरण वाहिनीचा विस्तार असलेने दि. १५.७.२०११ पर्येत कृती मानके विनियमानुसार मंजुरी व भरावयाचे चलन मिळावयास हवे होते. हे चलन तक्रारदारास दि. ३१.१०.२०११ रोजी मिळालेले आहे. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १.९.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाचा आदेश अद्याप न मिळाल्याने मंचाकडे गाऱ्हाणे दाखल केले. मंचाकडून अपेक्षित मदत - चलन देण्यास झालेल्या विलंबापोटी भरपाई मिळावी, जादा रोहित्र मंजूर असलेने वीज पुरवठा मिळण्यास कालावधी लागणार असलेने ही भरपाई रोख स्वरुपात मिळावी, एल.टी. एक्स्टेंशन करुन वीज पुरवठा २/३ महिन्यात मिळावा असा आदेश व्हावा व वि.प.ने त्याचे पालन केल्यास भरपाई नको असे नमूद आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ५.१.२०१२ च्या लेखी अहवालात अर्जदार ग्राहकाचा नवीन शेतीपंपासाठी दि. १६.६.२०११ रोजी अर्ज प्राप्त झाल्याचे व चलन दि. ३१.१०.२०११ रोजी मान्य केले आहे. संख उप विभागात कर्मचारी संख्या अपुरी आहे, त्याचप्रमाणे दुरुस्तीची कामे, वीज बील वसुली व इतर कामामुळे चलन देण्यात विलंब झालेला आहे. ही बाब लक्षात घेवून तक्रारदाराने मागितलेली नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. ११.१.२०१२ रोजी मंचासमोर सुनावणीस घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, सहाय्यक अभियंता संख उप विभाग श्री. कदम उपस्थित. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी विलंब झाल्याचे मान्य केले, परंतु लेखी म्हणण्यात दिलेल्या कारणांमुळे विलंब झाला असल्याने तक्रारदार ग्राहकाची भरपाईची मागणी मान्य करु नये अशी विनंती केली.

विद्युत कायदा २००३ अंतर्गत कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार भरपाई माफ होऊ शकत नाही. त्यामुळे ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे १० आठवड्यांच्या विलंबापोटी रु. १०००/- भरपाई मिळण्यास ग्राहक हक्कदार आहे व वितरण कंपनीची ती जबाबदारी आहे.

ग्राहकाची भरपाईची रक्कम रोखीने मिळावी ही मागणी कृती मानके विनियमातील तरतुदीत बसत नाही, कारण शेतीपंपासाठी वीज कनेक्शन असल्याने भरपाई दोन बिलींग सायकलमध्ये समायोजित करण्याची तरतूद आहे. उभयबाजूना रोहित्राचे काम आहे हे मान्य आहे. रोहित्राचे काम करुन वीज जोडणी देण्यास १ वर्षाची मुदत आहे. एल.टी. एक्स्टेंशन करुन वीज पुरवठा २/३ महिन्यात दिल्यास भरपाईची मागणी सोडून देण्यात तक्रारदार ग्राहकाने तयारी दर्शविली आहे. परंतु असा वीज पुरवठा सुरक्षित होऊ शकत नाही, त्यामुळे असे आदेश करणे मंचास संयुक्तिक वाटत नाही. खालील प्रमाणे आदेश -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

## आदेश

१)  तक्रार अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

२)  वितरण कंपनी संख उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी दि. १६.७.२०११ ते दि. ३१.१०.२०११ या कालावधीतील १० आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे रु. १०००/- तक्रारदार ग्राहकास भरपाई द्यावी. सदर रकमेचे समायोजन दोन बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरीत रक्कम रोखीने ग्राहकास द्यावी.

३)  ग्राहकाची भरपाईची रक्कम रोखीने मिळावी ही मागणी फेटाळण्यात येत आहे.

४)  सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५)  या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे- पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com